दैनिक


# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २०४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.०६ मार्च २०२५


## थोडक्यात

### अनैतिक संबंधातून चुलतीचा खून...

**दि.०५, दौंड :** मागील दोन महिन्यांपूर्वी दौंड तालुक्यात कडेठाण गावात बिबट्याच्या हल्ल्यात एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडल्याचे समोर आले होते. पण त्या महिलेचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला नव्हता, तर पुतण्यासोबत त्या महिलेचे अनैतिक संबध होते आणि त्या दोघांमध्ये पैशावरून वाद होत असायचे, त्यातून पुतण्याने साथीदाराच्या मदतीने चुलतीचा खून केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यामुळे एकच खळबळ उडाली आहे. पुतण्या अनिल पोपट धावडे आणि साथीदार सतीलाल वाल्मिक मोरे या दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. लता धावडे असे मृत महिलेचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी पुतण्या अनिल पोपट धावडे आणि मृत लता धावडे या दोघांमध्ये अनेक महिन्यांपासून अनैतिक संबंध होते. पण मध्यंतरी लता धावडे या आरोपी अनिल धावडेकडे पैशांची मागणी करीत होत्या आणि सततच्या पैशाच्या मागणीला अनिल वैतागला होता. तर अनिल पैसे देत नव्हता, त्यामुळे लता धावडे या त्याला भेटण्यास येत नव्हत्या. त्यामुळे अनिल धावडे यांनी त्याचा साथीदार सतीलाल मोरे याच्या मदतीने लता धावडे हिच्या खुनाचा कट रचून तिच्या डोक्यात दगड घालून हत्या केली आणि लता धावडे यांचा मृतदेह शेताच्या बाजूला टाकला. बिबट्याच्या हल्लयात लता धावडे यांचा मृत्यू झाल्याचा बनाव त्यावेळी करण्यात आला होता. पोलिसांनी त्यावेळी पंचनामा करून व्हिसेरा तपासणीसाठी नागपूरच्या प्रयोगशाळेत पाठविण्यात आला होता. त्या प्रकरणाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर, त्या महिलेचा मृत्यू बिबट्याच्या हल्लयात झाला नसल्याचे नमूद करण्यात आले. त्या प्रकरणातील आरोपीचा शोध सुरू असताना, सतीलाल मोरे या आरोपीच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने, त्याच्याकडे अधिक चौकशी केल्यावर त्याने आणि अनिल धावडे या दोघांनी मिळून लता धावडे या महिलेचा खून केल्याची कबुली दिली. त्यानंतर दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून यवत पोलीस अधिक तपास करीत आहे.

# धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यानंतर पुन्हा मोठा घोटाळा समोर...



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, नागपूर :** राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सोमवारपासून राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या अभिभाषणाने सुरुवात झाली आहे. डिसेंबरमध्ये बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाली होती. या हत्याकांडांमध्ये मंत्री धनंजय मुंडे यांच्या निकटवर्तीयांचा हात असल्याचा आरोप करत विरोधकांसह सत्ताधारी पक्षातील नेतेही त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत होते. अखेर मुंडे यांनी मंगळवारी राजीनामा दिला. त्यानंतर आता एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना मोठा घोटाळा झाला असा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे सरकार समोरचे संकट पुन्हा वाढणार का अशी चर्चा आहे.

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच्या काळात अनेक योजना सुरू करण्यात आल्या होत्या. या योजनांच्या जोरावर राज्यात फडणवीस आणि शिंदे सरकार निवडून आले. परंतु, यातील अनेक योजनांवर आता आक्षेप घेणे सुरू झाले आहे. विधानसभा निवडणूक जाहीर होण्यापूर्वी महायुतीच्यावतीने असंघटित क्षेत्रातील बांधकाम कामगारांना मोठ्या प्रमाणात साहित्याचे वाटप झाले होते. याकरिता मोठमोठे कार्यक्रम करण्यात आले होते. हजारो कामगारांना एकाच दिवशी साहित्याची किट वाटप करण्यात आली होती.

यात मोठा घोटाळा झाला असल्याची शंका व्यक्त केली जातेय. नागपूरचे काँग्रेसचे शहराध्यक्ष आणि पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार विकास ठाकरे यांनी माहिती अधिकार कायद्यांतर्गत लाभार्थ्यांची यादीच मिळवली असून कामगार मंत्र्यांकडे सादर केली आहे. त्यामुळे शिंदे सरकारच्या कार्यकाळातील आणखी एक घोटाळा उघडकीस येण्याची शक्यता आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात विकास ठाकरे यांनी या घोटाळ्याकडे लक्ष वेधले होते. आपल्याकडे लाभार्थ्यांची यादीत असून यातील काही लाभार्थी हे कामगार नाहीत, अशांना किट वाटप करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे. यावर कामगार मंत्री काय कारवाई करणार अशी विचारणा त्यांनी केली होती. विकास ठाकरे यांनी विचारलेल्या या प्रश्नावर कामगार मंत्र्यांनी तपासून कारवाई करू, असे आश्वासन दिले आहे.

मात्र विकास ठाकरे यांच्याकडे असलेल्या कामगारांच्या यादीत कोणाकोणाची नावे आहेत याची उत्सुकता सर्वांना लागली आहे. नागपूरमध्ये झालेल्या साहित्य वाटपच्या कार्यक्रमानंतर किट अनेक प्रतिष्ठित तसेच श्रीमंतांकडे घरपोच पोहचवून दिल्याची चर्चा रंगली होती. ठाकरे यांच्या दाव्यानंतर यात तथ्य असल्याचे दिसून येते असून आता किट घेणाऱ्या बोगस कामगारांची यादी यादी सर्वाजनिक केल्यास अनेकांचे बिंग फुटू शकते.

# दोन कुटुंबातील वाद; चौघांचा चाकूने हल्ला, पित्याचा मृत्यू, पुत्र गंभीर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, बुलडाणा :** चौघा जणांनी केलेली अमानुष मारहाण आणि धारधार चाकूने सपासप वार केल्याने पित्याचा मृत्यू झाला तर पुत्र गंभीर जखमी झाला. गंभीर जखमी असलेल्या मुलावर अकोला येथे उपचार करण्यात येत आहे. खामगाव तालुक्यातील शेलोडी येथे हा रक्त रंजित थरार रंगला असून दोन कुटुंबातील जुना वाद नव्याने उफाळून आल्याने हे हत्याकांड झाले आहे. यामुळे शेलोडी गावासह खामगाव तालुका देखील अक्षरशः हादरला आहे.

रघुनाथ गाडे असे मृत व्यक्तीचे नाव असून असून त्यांचा मुलगा गोपाल गाडे गंभीर जखमी असून त्याला उपचारसाठी अकोला येथे हलविण्यात आले आहे. त्याची प्रकृती अत्यवस्थ असल्याचे सांगण्यात आले.

प्राप्त माहितीनुसार शेलोडी येथील रघुनाथ गाडे आणि पवन दशरथ बानाईत यांच्या कुटुंबात गेल्या काही दिवसांपासून जुना वाद सुरू आहे. या वादातून पवन बानाईत याने रघुनाथ गाडे यांना 'एखाद्या दिवशी जीवाने मारण्याची धमकी' दिली होती. गाडे व बाणाईत परिवारातील हा वाद शमण्याऐवजी आणखी उफळला.

दरम्यान, घटना प्रसंगी रात्री घरासमोर गाडी लावण्याच्या क्षुल्लक कारणावरून दोन्ही कुटुंबातील वाद पुन्हा उफाळून आला. यावेळी पवन बानाईत याने धारदार शस्त्राने रघुनाथ गाडे यांच्यावर निर्घृणपणे सपासप वार केले. त्याने वडिलांना वाचवण्यासाठी आलेल्या गोपाल गाडे याच्या पोटातही शस्त्राने वार करून गंभीर जखमी केले. सदर घटना लक्षात येताच गाडे कुटुंबीयांनी जखमींना खामगाव येथील उप जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. उपचार सुरू असतानाच रघुनाथ गाडे यांचा मृत्यू झाला तर गोपाल गाडे याची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला पुढील उपचारसाठी अकोला येथे हलविण्यात आले. त्याची प्रकृती अत्यवस्थ असून डॉक्टर त्याचे प्राण वाचविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करीत आहे. याप्रकरणी मृत रघुनाथ गाडे यांचा पुतण्या मनोहर गाडे याने खामगाव ग्रामीण पोलीस ठाणे येथे तक्रार दिली.




खामगाव ग्रामीण पोलिसांनी आरोपी पवन दशरथ बानाईत, मनोरमा दशरथ बानाईत, दशरथ आत्माराम बानाईत, मोहन दशरथ बानाईत या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. भारतीय न्याय संहिता, दोन हजार तेवीसच्या कलम ११८(२), ३५१(२)(३), ३(५) भारतीय न्याय संहितानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास उपनिरीक्षक रांची पुसाम करत आहेत. या घटनेमुळे शेलोडी गावात तणाव निर्माण झाला असून खामगाव ग्रामीण पोलीस परिस्थिती वर नजर ठेवून आहे.

# होय, आम्हीच होणार चॅम्पियन !

# भारत विरुद्ध न्यूझीलंड रंगणार फायनल सामना !





चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या उपांत्य फेरीत न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेचा धावांनी दारूण पराभव करत अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे. आता चॅम्पियन्स ट्रॉफीचा अंतिम सामना भारत वि. न्यूझीलंड या संघांमध्ये होणार आहे. न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासातील विक्रमी धावसंख्या उभारत दक्षिण आफ्रिकेच्या संघाला मोठं आव्हान दिलं होतं. पण सातत्याने विकेट्स गमावल्याने आफ्रिकेचा संघ मागे राहिला. पण दक्षिण आफ्रिकेकडून डेव्हिड मिलरने अखेरच्या चेंडूवर शतक पूर्ण करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं.

भारत वि. न्यूझीलंड यांच्यातील सामना दुबईत ९ मार्चला खेळवला जाणार आहे. भारतीय संघाने ऑस्ट्रेलियाला उपांत्य फेरीत ४ विकेट्सने पराभूत करत आधीच अंतिम फेरीत स्थान मिळवले होते. तर आता न्यूझीलंडने आफ्रिकेला पराभूत करत फायनलचं तिकिट मिळवली. न्यूझीलंड संघाने दिलेल्या ३६३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आफ्रिकेचा संघ ९ विकेट्स गमावत ३१२ धावाच करू शकला. उत्कृष्ट लयीत असलेला रायन रिकल्टन १७ धावा करत बाद झाला. तर कर्णधार टेम्बा बावुमा आणि रॅसी व्हॅन डेर ड्युसेन यांनी चांगली भागीदारी रचली पण संघाला विजयापर्यंत नेऊ शकले नाही. बावुमाने ७१ चेंडूत १ षटकार आणि ४ चौकारांसह ५६ धावा केल्या आहेत. तर ड्युसेनने ६६ चेंडूत २ षटकार आणि ४ चौकारांसह ६९ धावा केल्या. आफ्रिकेला सर्वात मोठा धक्का बसला तो म्हणजे क्लासेनच्या रूपात. क्लासेन ३ धावा करत बाद झाला. मारक्रम चांगल्या लयीत होता पण तो ३१ धावा करत बाद झाला.

मिलर वगळता आफ्रिकेच्या खलच्या फळीतील कोणालाच मोठी कामगिरी करता आली नाही. पण डेव्हिड मिलरने अखेरच्या चेडूवर आपले शतक पूर्ण केले. मिलरने अवघ्या ६७ चेंडूत १० चौकार आणि ४ षटकारांसह शतक पूर्ण केले. न्यूझीलंड संघाच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी करत संघाला विकेट मिळवून दिल्या. मॅट हेन्री आणि ग्लेन फिलीप्सने प्रत्येकी २ विकेट घेतले. तर कर्णधार मिचेल सँटनरने सर्वाधिक ३ विकेट्स घेतले. मायकेल ब्रेसवेल आणि रचिन रवींद्र यांना १-१ विकेट घेता आली. न्यूझीलंड संघाने या सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासातील सर्वात मोठी धावसंख्या ३६२ धावा उभारल्या. न्यूझीलंडकडून रचिन रवींद्र आणि केन विल्यमसनने संघाच्या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. रचिनने १०८ धावा तर विल्यमसनने १०२ धावा करत या दोन्ही खेळाडूंनी आपआपली शतकं पूर्ण केली. यानंतर डॅरिल मिचेल आणि ग्लेन फिलीप्स यांनी वादळी फलंदाजी करत ४९-४९ धावांची खेळी केली. तर मायकेल ब्रेसवेलने १६ धावा केल्या. न्यूझीलंडच्या फलंदाजांवर वचक बसवण्यात आणि झटपट विकेट्स घेण्यात आफ्रिकेचे गोलंदाज अपयशी ठरले आणि त्यांना इतक्या मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. आफ्रिकेकडून लुंगी एनगिडीने ३ विकेट्स, रबाडा २ विकेट्स तर वियान मुल्डर एक विकेट घेऊ शकले.

# बीडमध्ये जे खून झाले त्यांच्या फाईल उघडल्या गेल्या पाहिजेत - खासदार सुप्रिया सुळे

**दि.०५, सासवड :** खासदार सुप्रिया सुळे यांनी आज सासवड येथे येऊन पुरंदर तालुका आढावा बैठकीमध्ये तालुक्यातील टंचाईच्या परिस्थितीचा आढावा घेतला. यानंतर पत्रकार परिषद घेतली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष माणिक झेंडे, सुदामराव इंगळे, विजय कोलते, पुष्कराज जाधव, वामन कामठे, योगेश फडतरे, ॲड. गौरीताई कुंजीर, मनोहर जगताप आदी उपस्थित होते. पत्रकार परिषदेमध्ये त्यांनी शासनावर कडाडून टीका केली.

कालच मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे बीड जिल्ह्यामध्ये जे खून झाले आहेत त्या सर्व प्रकरणांच्या फाईल उघडल्या गेल्या पाहिजेत. त्याची स्वतंत्र चौकशी झाली पाहिजे ही मागणी केली आहे. धनंजय मुंडे यांनी जे व्यक्तव्य केले आहे त्याचा मी जाहीर निषेध केलेला आहे. त्यांनी नैतिकतेचा न पण वापरला नाही, त्यांच्या पक्षात काय चालले आहे हे त्यांनाच माहीत. सुरेश धस यांनी एक स्टेटमेंट केले आहे त्यामध्ये नैतिकता आणि धनंजय मुंडे यांची भेट झाली नाही हे दुर्दैव आहे असे म्हणले आहे. वाल्मीक कराडचे पीए धनंजय मुंडे यांना भेटायला गेले होते. यावरून त्यांचे नाते किती घट्ट आहे हे कळून येते. यांनाही सह आरोपी करा अशी आमची मागणी आहे, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. पंकजा मुंडे यांनी त्या कुटुंबाची माफी मागितली आहे. त्यांनी सुसंस्कृतपणा दाखवला आहे. खंडणी झाली, खून, हिंसाचार, शेतकरी यांची फसवणूक झाली, अजून काही करायचे राहिले आहे का, कुठला गुन्हा राहिला आहे. यातील आरोपीला व्हीआयपी ट्रीटमेंट मिळते, ज्या गोष्टी बाहेर ऐकायला मिळतात त्या भयंकर आहेत, यामुळे महाराष्ट्र बदनाम होत आहे. लोकांनी यांना विश्वासाच्या नात्याने सत्ता दिली, पण तुम्ही कुठलाच गुन्हा सोडला नाही. व्हिडिओमधले फोटो पाहून त्यांच्या कुटुंबातील लोकांना काय वाटत असेल, किती यातना होत असतील. या विषयावर जनतेच्या भावना तीव्र आहेत न्याय मिळालाच पाहिजे, असे सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

**महायुती सरकारच्या काळात आंदोलन केल्याशिवाय काहीच मिळत नाही...**

पुणे महानगरपालिकेत ११३ जागा भरायच्या आहेत, यासाठी २७००० मुलांनी अर्ज केलेत. पैसे भरून घेतले आहेत. तरीसुद्धा जागा भरल्या का जात नाहीत हा प्रश्न मी विचारणार आहे, नाहीतर आंदोलन करावे लागेल. आंदोलनाशिवाय या सरकारच्या काळात काहीच मिळत नाही. असे सुप्रिया सुळे यांनी सांगितले. पुरंदर तालुका आढावा बैठकीमध्ये त्यांनी दाखल्यांचे प्रश्न, पुरंदर उपसा सिंचन योजनेतील अडचणी जाणून घेतल्या. पुणे जिल्ह्यात पहिला टँकर पुरंदर तालुक्यात सुरू झाला ही आपल्यासाठी चिंताजनक परिस्थिती असल्याचे त्यांनी सांगितले.




## नदी पुनरुज्जीवन...

गुजरातमधील साबरमती नदीच्या धर्तीवर पुण्यातील मुळा-मुठा नदीकाठ संवर्धन, पुनरुज्जीवन आणि सुशोभीकरण योजना राबविण्याचा मानस पुणे महापालिकेत २०१७ मध्ये सत्तेवर आलेल्या भारतीय जनता पक्षाने व्यक्त केला आणि नंतर प्रत्यक्ष कामही सुरू झाले. तब्बत ४ हजार ७२७ कोटी रुपयांच्या या महत्त्वाकांक्षी योजनेवर अनेक आक्षेप घेतले जात आहेत. मात्र, त्यानंतरही भाजप आणि महापालिका प्रशासनाची या योजनेसाठी आग्रही भूमिका कायम आहे. यासाठीचे सर्व पैसे करदात्यांच्या खिशातून खर्च होणार आहेत. त्यामुळे ही योजना नेमकी काय आहे, तिचे दूरगामी परिणाम काय होतील, या सर्व प्रश्नांची शास्त्रीय उत्तरे शोधणे ही सर्वांचीच जबाबदारी आहे. एके काळी हिरव्यागार टेकड्या, स्वच्छ वाहत्या नद्या आणि समृद्ध जैववैविध्यासाठी ओळखले जाणारे पुणे अलीकडच्या काही वर्षांत पर्यावरणाच्या दृष्टीने संवेदनशील झाले आहे. मोठ्या प्रमाणावरील नागरीकरणात नद्या, नाले आणि ओढ्यांच्या पात्रांवर अतिक्रमण झाले आहे. नद्यांमधील जैववैविध्य नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. टेकड्या उजाड झाल्या आहेत. नद्यांची वहनक्षमता कमी झाल्याने आणि शहराची संपत्ती म्हणून नद्यांकडे पाहिले जात नसल्याने नद्यांचे संवर्धन, पुनरुज्जीवन करण्याची आवश्यकता अधोरेखित झाली आणि त्यातूनच पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधून वाहणाऱ्या मुळा-मुठा नदीकाठांच्या संवर्धन, पुनरुज्जीवन आणि सुशोभीकरणाची योजना पुढे आली. या योजनेसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जाणार आहे. मात्र हा प्रश्न केवळ आर्थिक नाही. तर कधीही भरून न निघणाऱ्या पर्यावरणाच्या हानीचाही आहे. तो नद्यांच्या काठांपुरता सीमित नसून, तेथून दूर राहणाऱ्यांच्या घरांच्या अस्तित्वाचाही आहे.

**नद्यांची सद्या:स्थिती काय?**

शहर परिसरातून मुठा, मुळा, पवना, रामनदी आणि देवनदी या नद्या वाहतात. या पाचही नद्यांचा संगम होऊन मुळा-मुठा ही एक नदी बाहेर पडते. अनेक घटकांमुळे या नद्यांचा ऱ्हास होत आहे. पूरनियंत्रण, नद्यांची स्वच्छता, त्यांचे पुनरुज्जीवन आणि नद्यांचे आणि नागरिकांचे नाते जोडणे या उद्देशाने मुळा-मुठा नदीकाठ संवर्धन, पुनरुज्जीवन आणि सुशोभीकरण ही योजना राबविण्यात येत आहे, असे प्रशासनाचे म्हणणे आहे. मुळा, मुठा आणि मुळा-मुठा या ४४ किलोमीटर लांबीच्या नद्यांचे पुनरुज्जीवन होईल, असा दावाही करण्यात येत आहे.

**समस्या काय?**

मुबलक पाण्यामुळे शहराची वाढ मोठ्या प्रमाणावर झाली आहे. मात्र याला दुसरी बाजूही आहे. २०१९ मध्ये आंबिल ओढ्याला व नद्यांना आलेल्या पुराने अवघ्या काही तासांत शेकडो घरे उद्ध्वस्त झाली. कोट्यवधी रुपयांचे नुकसान होऊन २५ निष्पाप नागरिकांना प्राण गमवावे लागले. असाच अनुभव पुणेकरांनी २०२४ सालीही घेतला. हे असे का होत आहे? पूर्वीदेखील असेच होत होते का? भविष्यातही सातत्याने पूरपरिस्थिती निर्माण होणार का? याला जबाबदार कोण? असे अनेक प्रश्न यानिमित्ताने पुढे येत आहेत. मात्र, खरा प्रश्न आहे तो शास्त्रशुद्ध उत्तरे कधी शोधली जाणार हा.

मुळा-मुठा नदीमुळे पाच वेगेवगेळ्या पाणलोट क्षेत्रांतून पुण्यात पाणी येते. मात्र शहराची भौगोलिक रचना 'बशी'सारखी असल्याने मुसळधार पावसात चहुबाजूंनी शहराच्या मध्यभागाकडे वेगाने पाणी येते व पूरपरिस्थिती निर्माण होते. या नद्यांवर पुण्याच्या ऊर्ध्व बाजूला सात लहान-मोठी धरणे आहेत आणि ती अंतराच्या दृष्टीने एकमेकांपासून फारशी लांब नाहीत. या सर्व नद्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या पाणलोट क्षेत्रांचे स्वरूप. ही क्षेत्रे डोंगर-दऱ्यांची आणि तीव्र उतारांची आहेत. त्यामुळे पावसाचे पाणी खूप वेगाने नदी किंवा ओढ्यांमध्ये येते. रामनदी आणि आंबिल ओढ्याच्या पुरांनी हा प्रकार सप्रमाण सिद्ध केला आहे.

'दी एनर्जी अॅण्ड रिसोर्सेस इन्सिट्यूट' (टेरी) या संस्थेने २०१४ मध्ये राज्य शासनाला 'महाराष्ट्र स्टेट अडॉप्शन अॅक्शन प्लॅन' नावाचा अहवाल दिला आहे. या अहवालात 'भविष्यात पुण्यात पावसाचे प्रमाण ३७.५० टक्के वाढेल आणि मोठ्या प्रमाणावर ढगफुटी होईल,' असा स्पष्ट अंदाज वर्तविण्यात आला आहे. गेल्या २०-२५ वर्षांत शहरातील नद्यांची अवस्था भीषण झाली आहे. लोकसंख्या वाढत असल्याने सांडपाणी मोठ्या प्रमाणावर निर्माण होते. मात्र महापालिकेच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची क्षमता आणि कार्यक्षमता तोकडी पडत आहे. औद्योगिक प्रदूषणाची भर पडत आहे. नद्यांची वहन क्षमता कमी झाली आहे. निळ्या आणि लाल रंगांत दर्शविलेल्या निषिद्ध क्षेत्रांतही मोठ्या प्रमाणावर बांधकामे झाली आहेत.

# विजेतेपदापासून एक पाऊल दूर !!

पाकिस्तान आणि दुबईत चालू असलेली एकदिवसीय चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा अंतिम टप्प्यात आली असून अपेक्षेप्रमाणे भारताने या स्पर्धेत चमकदार कामगिरी करत अंतिम फेरी गाठली. भारताने काल झालेल्या पहिल्या उपांत्य लढतीत पाच वेळेचा विश्व विजेता आणि दोन वेळेचा चॅम्पियन्स ट्रॉफीचा विजेता असलेल्या ऑस्ट्रेलियाला चार गडी राखत सहज नमवले. वास्तविक हा सामना सुरू होण्यापूर्वीच भारत या सामन्याच्या संभाव्य विजेता म्हणून गणला जात होता मात्र क्रिकेट रसिकांच्या मनात कोठेतरी धाकधूक होती कारण ऑस्ट्रेलिया हा संघ भारताला कायम जड गेला आहे.

विशेषतः आयसीसी स्पर्धेत ऑस्ट्रेलियाने कायम भारतावर वर्चस्व राखले आहे. बाद फेरीच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताला अनेकदा नमवले आहे. नोव्हेंबर २०२३ मध्ये एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियानेच भारताचा पराभव करून विश्वविजेता होण्याचे १४४ कोटी भारतीयांचे स्वप्न धुळीस मिळवले होते. त्याच वर्षी झालेल्या विश्व कसोटी चॅम्पियन्सशिपच्या अंतिम फेरीतही ऑस्ट्रेलियानेच भारताला हरवले होते. इतकेच काय २००३ च्या विश्वचषक स्पर्धेतही ऑस्ट्रेलियानेच भारताने हरवले होते त्यामुळे यावेळीही ते त्याची पुनरावृत्ती करतील की काय ? अशी भीती क्रिकेट रसिकांना होती मात्र भारतीय खेळाडूंनी अप्रतिम खेळ करून ही भिती खोटी ठरवली. काल झालेल्या उपांत्य फेरीच्या पहिल्या लढतीत ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करत २६४ धावा काढल्या. भारताच्या सर्वच गोलंदाजांनी अप्रतिम गोलंदाजी करून ऑस्ट्रेलियाचे सर्व फलंदाजांना बाद केले. भारतीय गोलंदाजांनी अप्रतिम कामगिरी करत ऑस्ट्रेलियाला पूर्ण ५० षटकेही खेळू दिले नाही. गोलंदाजांनी केलेल्या अप्रतिम कामगिरीने भारताचे पन्नास टक्के काम फत्ते झाले होते.

मात्र फलंदाजी करताना रोहित शर्मा आणि शुभमन गिल ही कर्णधार आणि उपकर्णधारची जोडी स्वस्तात बाद झाल्याने क्रिकेट रसिकांची धाकधूक वाढली पण चेस मास्टर असलेला जगातील सर्वोत्तम फलंदाज असलेल्या विराट कोहलीने मै हू ना.... म्हणत नेहमीप्रमाणे दिमाखदार खेळ करत भारताला विजय मिळवून दिला. संघ अडचणीत असताना विराट कोहलीने ८४ धावांची आकर्षक खेळी करून कांगारू गोलंदाजांची हवा काढून टाकली त्याला श्रेयस अय्यर, अक्षर पटेल, के एल राहुल आणि हार्दिक पांड्य ने अप्रतिम साथ दिली त्यामुळे भारतीय संघ अंतिम फेरीत पोहचू शकला. भारताने या सामन्यात अप्रतिम खेळ केला. केवळ याच सामन्यात नव्हे तर संपूर्ण स्पर्धेत भारतीय संघाने अप्रतिम कामगिरी केली. भारताने या स्पर्धेत खेळलेल्या सर्वच्या सर्व सामन्यात विजय मिळवत अंतिम फेरीचे तिकीट बुक केले. आज म्हणजे ६ तारखेला दक्षिण आफ्रिका व न्युझीलंड यांच्यात दुसरा उपांत्य सामना लाहोरच्या गडाफी स्टेडियमवर होईल. या सामन्यातील विजयी संघ ९ तारखेला विजेतेपदासाठी अंतिम सामन्यात भारताशी लढेल. भारताने या स्पर्धेत चमकदार कामगिरी करत दिमाखात अंतिम फेरी गाठली आहे. या स्पर्धेतील एकमेव अजिंक्य संघ भारत आहे. या स्पर्धेत एकाही संघाला भारताला नमवण्यात यश आले नाही. विशेष म्हणजे भारताने जिंकलेले सर्वचे सर्व सामने एकतर्फी जिंकले आहेत. प्रतिस्पर्धी संघाला भारताने जराही संधी दिली नाही. गोलंदाजी, फलंदाजी, आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर भारताने एकहाती वर्चस्व गाजवले आहे. भारताचे सर्व फलंदाज जबरदस्त फॉर्मात आहे. रोहित, विराट, गील, श्रेयस, राहुल सर्वांनीच धावा काढल्या आहेत. हार्दिक पांड्याला मोठी धावसंख्या उभारता आली नसली तरी तो मोक्याच्या वेळी मॅच विनिंग खेळी करू शकतो.

उपांत्य फेरीत त्याने ते दाखवून दिले आहे. भारताचे गोलंदाज तर स्वप्नवत कामगिरी करत आहे. भारताचे सर्वच गोलंदाज अप्रतिम कामगिरी करत प्रतिस्पर्धी फलंदाजांना जेरीस आणत आहेत. शमी, पांड्या, जडेजा, कुलदीप यादव, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती या भारताच्या गोलंदाजांनी या स्पर्धेत जी कामगिरी केली आहे तशी कामगिरी याआधी भारताच्या कोणत्याही गोलंदाजांनी केलेली नाही. एकाच वेळी भारताच्या सर्व गोलंदाजांमध्ये विकेट घेण्याची स्पर्धा लागली आहे विशेष म्हणजे यात सर्वच गोलंदाज यशस्वी होत आहे. एकाच स्पर्धेत सर्वचे सर्व गोलंदाज भेदक गोलंदाजी करत असल्याचे चित्र प्रथमच पाहायला मिळत आहे. असे म्हणतात की फलंदाज सामना जिंकून देतात तर गोलंदाज स्पर्धा. भारताने या स्पर्धेवर जे एकहाती वर्चस्व गाजवले आहे ते गोलंदाजांमुळेच. गोलंदाजांचा हाच फॉर्म अंतिम फेरीत कायम राहिला तर भारत या स्पर्धेचा विजेता ठरेल यात शंका नाही. आज होणाऱ्या दुसऱ्या उपांत्य फेरीत न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका एकमेकांशी झुंझेल. अर्थात न्यूझीलंडचा सध्याचा फॉर्म, अनुभव आणि दक्षिण आफ्रिकेची ऐनवेळी कच खाण्याची वृत्ती पाहता ते दक्षिण अफ्रिकेला मात देऊन अंतिम फेरीत पोहचू शकतात. तसे झाले तर ९ तारखेला भारत आणि न्यूझीलंड यांच्यात अंतिम सामना रंगू शकतो. अर्थात न्युझीलंड असो की दक्षिण आफ्रिका समोर कोणीही असो भारतीय संघाने जर आपल्या क्षमतेनुसार खेळ केला तर भारताला कोणीही विजयापासून रोखू शकत नाही भारत. उपांत्य फेरी प्रमाणे भारतीय खेळाडूंनी अंतिम फेरीत खेळ केला तर भारतला चॅम्पियन्स होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही एकूणच चॅम्पियन ट्रॉफीच्या विजेतेपदापासून भारत अवघा एक पाऊल दूर आहे. जर भारतीय खेळाडूंनी आपल्या क्षमतेनुसार खेळ केला आणि नशिबाने साथ दिली तर हे एक पाऊल पार करून भारत १२ वर्षांने चॅम्पियन्स ट्रॉफीवर नाव कोरु शकतो आणि १४४ कोटी भारतीयांचे स्वप्न साकार करू शकतो. भारतीय संघाला अंतिम फेरीसाठी शुभेच्छा

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## पनवेल मनपा तिजोरीत दररोज १ कोटी रुपये होतात जमा...

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०५, पनवेल :** यावर्षीच्या आर्थिक वर्षामध्ये एप्रिल २०२४ महिन्यापासून ते आज दिनांक ०४ मार्च पर्यंत महापालिकेच्या तिजोरीत ३४१ कोटीहून अधिक मालमत्ता कर जमा झाला आहे. मालमत्ता कर हा महापालिकेचा एकमेव आर्थिक स्त्रोत असून आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या काही महिन्यांपासून नागरिकांनी मालमत्ता कर लवकरात लवकर भरावा असे आवाहन करण्यात येत असून याचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. यावर्षी महापालिकेच्या तिजोरीत ३४१ कोटीहून अधिक रूपयांची भर पडली आहे.



दिनांक ३१ मार्च ही मालमत्ता कर भरण्याची शेवटची तारीख असल्यामुळे व मालमत्ता कराच्या शास्तीमध्ये दरमहा दोन टक्क्यांची वाढ होत असल्याने नागरिक मोठ्या प्रमाणात आपला मालमत्ता कर भरत असून गेल्या चार दिवसापासून दररोज महापालिकेच्या तिजोरीत १ कोटीहून अधिक रक्कमेची भर पडत आहे. यामध्ये १ मार्च पासून आज दिनांक ४ मार्च पर्यंत एकुण भरणा ५ कोटी ५६ लाखाचा भरणा झाला आहे.

त्याचप्रमाणे मालमत्ताधारकांना नावामध्ये बदल करायचा असल्यास महापालिकेच्या 'पीएमसी टॅक्स ॲप' मोबाईल ॲपच्या माध्यमातून करता येणार आहे. या ॲपमध्ये नाव बदलाकरता रिक्वेस्ट केल्यास महापालिकेकडून नाव बदलानंतर संबधितांस नोटिफिकेशन मिळणार आहे.

## राजी नामा ..

येतोआदेश वरतूनि
देरे बाबा राजीनामा
नाईलाज अगतिक
राजी नसे जरीनामा

निदर्शने न्आंदोलने
विरोधी एकत्र जमा
उद्रेक उसळे मनाचा
जोरा करावा हंगामा

सबुरीचा देतीसल्ला
वाटपहा जरासे दमा
अस्वस्थ होती अति
उफाळूपाहे अस्थमा

भक्तमंडळी लाडकी
भोवताली लवाजमा
व्यवस्था व्यवस्थित
करेआधीखातरजमा

ऑल राईट होई सर्वं
करूनका मुळी तमा
एकवाद मिटलाचला
एका विषया खातमा

काही जण संतुष्टती
आक्रोश येतो कामा
वर्णीलागे दुस-याची
एक बंगला रिकामा

आला बुवा उन्हाळा
वाढूलागे पुन्हाउष्मा
बदलली समीकरणे
राजीनामा येईकामा

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# महामानवांना डोक्यात घेऊया !

आज तरुणांच्या मनात फार मोठी घालमेल होत असल्याचे मी अनुभवत आहे. त्यांच्यासारखंच हुर्रे...! म्हणत अफाट उत्साहानं नाचणं, अंधपणे दुसऱ्याच्या मागे धावणं आणि आग्रही होणं मी देखील एकेकाळी केलं आहे. खरंतर असं वागणं अनेक वेळा भरकटत असतं . जीवनरूपी सेतू पार करत असताना कोणताही तरुण भरकटू नये, असं नेहमी मला वाटत असतं . तरुणांसमोर' दीपस्तंभ' असलेच पाहिजेत!



या मतावर मी ठाम आहे. समाजातील विचारवंत,' महापुरुषांना डोक्यावर घेऊन नाचण्यापेक्षा, डोक्यात घ्या!' असा सल्ला नेहमी देत असतात. परंतु बरेच तरुण याच्या उलट कृती करताना दिसून येतात. महापुरुषांच्या जयंती निमित्त निघणाऱ्या मिरवणुकांमध्ये मोठमोठाले डीजे लावून नाचतात, हुल्लडबाजी करतात, तर कधी कधी भांडण -तंटा करून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करतात. महापुरुषांची जयंती ही खऱ्या अर्थाने विचारांची जयंती साजरी व्हायला पाहिजे. तसं न घडता आज-काल आपली नाचण्याची हौस भागवण्यासाठी आपण जयंती साजरी करत आहोत का? असा प्रश्न संवेदनानशील नागरिकांच्या मनात निर्माण होत आहे . अशावेळी तरुणांसाठी महापुरुषांची चरित्रे, एकूणच त्यांचा विचार, आचार आणि कार्यकर्तृत्व आजच्या काळाशी सुसंगत करून सांगितलं पाहिजे. प्राचीन,मध्ययुगीन अथवा आधुनिक काळातील सोळाव्या, सतराव्या अथवा मागील दोन शतकांत होऊन गेलेले महापुरुष जसेच्या तसे मांडणे ह खरे तर इतिहास होय. तरुणांना महापुरुषांचे चरित्र वाचन रटाळपणाचे वाटू नये, यासाठी महापुरुषांचे चरित्र, विचार आणि कार्य आजच्या विज्ञान- तंत्रज्ञान, आधुनिक आणि लोकशाही व्यवस्थेला सुसंगत करून मांडण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

आज आपला समाज आपली राजकीय आणि सामाजिक प्रगती साधत आहे. पण या प्रगतीला नैतिकतेचे, सदाचाराचे आणि ठोस विचारांचे अधिष्ठान नसल्याचे जाणवत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे आपला समाज सांस्कृतिक आणि दर्जेदार शैक्षणिक प्रगती कडे दुर्लक्ष करत आहे. खरंतर कोणत्याही समाजाच्या उन्नतीचा पाया हा शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रगती हाच असतो. शिक्षणातून वैचारिक प्रगल्भता येते. सांस्कृतिक प्रगती साधण्यासाठी शिक्षणातून आलेल्या वैचारिक प्रगल्भतेचा उपयोग केला जातो. लेखन, चिंतन-मनन, परस्परांशी चर्चा,वाद-विवाद, व्याख्याने, संमेलने, मुलाखती, परिसंवाद, आढावा बैठकी,साहित्य संमेलने, ग्रंथ लेखन व त्यांची चिकित्सा या माध्यमातून महापुरुषांची जयंती होणे अपेक्षित आहे. यालाच महापुरुषांच्या विचारांची जयंती म्हणता येईल. आज पर्यंत झालेल्या सर्व परिवर्तनाच्या चळवळीचा अभ्यास केल्यानंतर ही गोष्ट ध्यानात आली आहे,की शैक्षणिक आणि सांस्कृतिक पाया भक्कम असणाऱ्या समाजामध्ये शाश्वत आर्थिक आणि राजकीय व्यवस्था उभारल्या आहेत.

'विचार थकले के विकार होतात !' या सुविचाराप्रमाणे एखादा व्यक्ती बुरसटलेल्या विचारांचा मागवा घेतो, तेव्हा तो व्यक्ती मन,भावना आणि बुद्धी या सर्व पातळीवर आजारी पडतो. त्याचप्रमाणे एखादा समाज अथवा देश देखील अंधश्रद्धा, बुरसटलेले विचार, चुकीचे आदर्श डोळ्यासमोर ठेवून मार्गक्रमण करू लागतो... तेव्हा ते देखील एखाद्या आजाराने खंगलेल्या रोग्याप्रमाणे गलितगात्र होऊ शकतात .म्हणून समाज अथवा देश परिवर्तन चळवळीसाठी दीपस्तंभ कोण असावेत? ह ठरवणे या सर्व पार्श्वभूमीवर महत्त्वाचे ठरते. आपल्या समाजातील तत्कालीन धुरिणांनी स्वातंत्र्योत्तर कालखंडात यावर फार मोठे विचार मंथन केले . आपले 'दीपस्तंभ ' अर्थातच 'आयडियल्स ' त्यांनी मोठ्या हुशारीने ओळखले आहेत. ते महापुरुष आज आपण सर्वांनी डोक्यात घेतले पाहिजेत . कारण हे महापुरुष आणि महनीय स्त्रिया याच समाजाच्या 'फिलॉसॉफर 'आणि 'गाईड्स ' असतात.

**- किशोर जाधव, सोलापूर**
**मो.नं.९९२२८८२५४१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

